नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०३/२०२५ (शनिवार) संध्याकाळ**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०६/०३/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, शिवापूर शिवार, ता भिवापूर, येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) तूषार नत्थू हेलुंडे, वय २५ वर्षे ,रा शिवापूर ता. भिवापूर २) सूजीत सूधाकर भोसले, वय ३७ वर्षे, रा. गरडेपार, ता भिवापूर३ ) दिगांबर विनायक मेश्राम, वय ४८ वर्षे, रा. शिवापूर, ता भिवापूर ४) अन्वीर जयसिंग पवार, वय ३६ वर्षे, रा गरडेपार, ता भिवापूर ५) रोशन दिलीप राजपूत, वय ३३ वर्षे, रा गरडेपार, ता. भिवापूर ६) राजू लक्ष्मण लोखंडे, वय ६५ वर्षे, रा. शिवापूर, ता. भिवापूर ७) सूनिल शामराव गूळधे, वय ४० वर्षे ,रा शिवापूर ,ता भिवापूर ८) अरविंद गूडेराव हांडे, वय ३२ वर्षे, रा. शिवापूर, ता. भिवापूर ९) राजू देवराव गिरी ,वय ३२ वर्षे , रा. शिवापूर, ता भिवापूर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते ,रोख रक्कम १५७०/— रूपय, ३ दुचाकी वाहने,४ ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण कि २,१६,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर